**<u>सरतपास शपथेवर पुन्हा सुरू:-</u>**

मी माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.१७० वर दाखल केले असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. मला कंपनीने साक्ष देण्याकरिता ठराव केलेला असुन तो मी अभिलेखावर दाखल केलेला आहे. त्यास **<u>निशाणी क्र.१७३</u>** देण्यात येत आहे. मी ग्रामपंचायतीच्या ठरावाची प्रत दाखल केली आहे. त्यावर सरपंच व ग्रामसेवक यांची सही आहे. मी दाखला दाखल केलेला असुन त्यावर सरपंच व ग्रामसेवक यांची सही आहे. मी प्रोसिडींग बुकची सत्यप्रत दाखल केली आहे. मी जिल्हाधिकारी यांचेकडील संचिकेची प्रत अभिलेखावर दाखल केली असुन ती मला देण्यात आली आहे. त्यास **<u>निशाणी क्र.१७४</u>** देण्यात येत आहे. मी आमच्या कंपनीच्या बँक स्टेटमेंटची प्रत अभिलेखावर दाखल केली असुन त्यास **<u>निशाणी क्र.१७५</u>** देण्यात येत आहे. मी आमच्या कंपनीला दिलेली ६ संमतीपत्रे व हमीपत्रे अभिलेखावर दाखल केलेले आहेत. सदरहू संमतीपत्र व हमीपत्रावर आमच्या कंपनीचे नाव नमुद आहे. (प्रतिवादी क्र.१९ यांचे वि. अधिवक्ता यांनी सदरहू संमतीपत्रास निशाणी क्रमांक देण्याची विनंती केली. प्रतिवादी क्र.२१ ते ४० व वादी यांचे वि. अधिवक्ता यांनी सदरहू हमीपत्रावर साक्षीदाराची अथवा कंपनीची सही नसल्याने संमतीपत्रास निशाणी क्रमांक देण्यास आक्षेप नोंदविला. साक्षीदाराने सदरहू संमतीपत्र व हमीपत्र त्यांच्या कंपनीस देण्यात आल्याचे व सदरहू बाब संमतीपत्रात व हमीपत्रात नमुद केले असुन सदरहू संमतीपत्र व हमीपत्र साक्षीदार यांच्या कंपनीस देण्यात आल्याने न्यायाच्या हिताच्या दृष्टीने आक्षेप नामंजूर करण्यात येतो व सदरहू संमतीपत्र व हमीपत्रास निशाणी क्रमांक देण्यात येत आहे.) सदरहू संमतीपत्र व हमीपत्रास **<u>निशाणी क्र.१७६ ते</u>**

<u>१८१</u> देण्यात येत आहेत.

<u>**उलटतपास प्रतिवादी क्र.१ ते १८ तर्फे**</u>

<u>**प्रतिवादी क्र.१ ते १८ यांचे वि. अधिवक्ता यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. प्रतिवादी क्र.१ ते १८ तर्फे उलटतपास नाही.**</u>

<u>**उलटतपास वादींतर्फे ॲड. तृप्ती पाटील:-**</u>

२. मी गेल्या ११ वर्षांपासुन प्रतिवादी क्र.१९ च्या कंपनीत काम करीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरहू कामातील कैफियत माझ्या सहीची नाही. मी सन २०१४ मध्ये कामास लागलो असुन सन २०१४ च्या पुर्वी मी कंपनीत नव्हतो, मला रेकॉर्डवरून माहीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला कंपनीचा ठराव केवळ कामकाज पाहण्याबाबत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी शपथेवर जबाब द्यावा असे ठरावात नमुद नाही. मी दाखल केलेल्या कागदपत्रांवर ग्रामपंचायतीचा जावक क्रमांक नमुद नाही. मी सरपंच व ग्रामसेवक यांच्या सहीच्या प्रती दिलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सातबाऱ्यावर ग्रामपंचायत मोहो असे कुठेही नाव नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरहू मिळकत ही केवळ मोहो व मोहोगावचा पाडा यांच्याशी संबंधित होती. हे म्हणणे खरे आहे की, महसुल मंत्री यांच्याकडे आम्ही जिल्हाधिकारी यांनी काढलेले परिपत्रक रद्द करावे म्हणुन मागणी केली होती, परंतु त्यांनी ते रद्द केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, अपील अंशत: मान्य करण्यात आले. त्यात जिल्हाधिकारी यांनी काढलेले परिपत्रक रद्द केलेले नाही व जिल्हाधिकारी यांचेकडे प्रकरण परत पाठविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, महाराष्ट्र लॅन्ड रेव्हेन्यू कोड प्रमाणे काही निवडक पंचांना गावकीची व गुरचरणाची जमीन विकता येत नाही. साक्षीदार स्वत: सांगतो की, दावा

मिळकत गुरचरणाची नाही.

प्रश्न : जिल्हाधिकारी यांनी गावकीची जमीन आमच्या कंपनीला विकत घेता येते असे पत्र कंपनीला दिले होते काय ?

उत्तर : दावा मिळकत वर्ग १ ची मिळकत असुन त्यास जिल्हाधिकारी यांच्या परवानगीची आवश्यकता नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की, गणु बाळू पाटील यांना मान्य नसल्याने त्यांनी विक्री ठरावावर सही केली नाही. सातबाऱ्यावर नोंद असलेले दत्तात्रय बाळू पाटील यांची विक्री ठरावावर सही नाही हे मला माहीत नाही. आमच्या कंपनीला संपर्क केलेले सातबारा उताऱ्यावरील लोक कोण होते याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र.१७४ मध्ये जिल्हाधिकारी-रायगड यांनी गावकीच्या जमिनीचे व्यवहार दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदले जाणार नाहीत याबाबत संबंधितांना सुचना दिलेल्या होत्या. साक्षीदार स्वत: सांगतो की, त्या आधीचे जिल्हाधिकारी यांचे पत्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही दावा मिळकत ज्यांच्याकडून खरेदी केली त्या पंचांना दावा मिळकत विक्री करण्याचा अधिकार नव्हता. सर्व्हे क्र.१४१ व ६३ यांची हद्द कुठे सुरू होते याची मला माहिती आहे. मोहो आणि चिखले गावाला लागुन उजव्या हाताला व मोहोचा पाडयाची काही घरे या सर्व्हे नंबरमध्ये आहेत. माझ्याकडे गावातील प्रतिष्ठीत व पंच लोक आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या कंपनीने ज्यांना पैसे दिले त्यांना दावा मिळकत विक्री करण्याचा अधिकार नव्हता व आमच्याकडे त्याबाबत पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, वांगणी, नेरे, वाजे ही गावे वेगवेगळी असुन मोह व मोहचा पाडा यांचा त्या गावांशी काहीही संबंध नाही.

ती वेगळी गावे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, बक्षीसपत्रात विक्री करणाऱ्या पंचांना दावा मिळकत विक्री करण्याचा अधिकार आहे असे कुठेही नमुद केलेले नाही. जिल्हाधिकारी यांचेकडून आमच्या कंपनीला सन २०१२ मध्ये पत्र आले. मला दिनांक आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मोह गावातील काही लोकांनी कंपनी विक्री केली व आमच्या कंपनीने त्यांना साथ दिली. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखताचा व्यवहार बेकायदेशीर आहे.

**उलटतपास प्रतिवादी क्र.२१ ते ४० तर्फे ॲड. अमित पाटील:-**

४. आता मला निशाणी क्र.१७० दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, मला कंपनीने शपथपत्र दाखल करण्याचा अधिकार दिलेला असुन कंपनीच्या वतीने उलटतपास किंवा साक्ष देण्याचा अधिकार दिलेला नाही. त्यात अधिकार असा शब्द नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीसंदर्भात झालेले व्यवहाराबाबत मला वैयक्तिक माहिती नाही. आता मला निशाणी क्र.१७३ दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, मला कंपनीने दिलेल्या अधिकारपत्रात साक्ष देण्यासाठीचे अधिकार दिलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, जमीन खरेदी करावयास गेल्यास त्या जमिनीची माहिती घेतली जाते. हे म्हणणे खरे आहे की, बल्लाळ जोशी यांनी दावा मिळकत मोह गावास बक्षीस दिलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे क्र.६३ ची जमीन गुरे चरण्यासाठी द्यावी अशी मोह गावाची मागणी असल्याने सदरहू जमीन मोह गावास देण्यात आल्याबाबत बक्षीसपत्रात नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, बक्षीसपत्रात सर्व्हे क्र.६३ ची जमीन गावकीसाठी व गुरे चरणासाठी वापरण्यात यावी असे नमुद आहे. सर्व्हे क्र.६३ ची जमीन खरेदी घेण्यापुर्वी बक्षीसपत्र झाल्याबाबतची माहिती कंपनीला होती. हे म्हणणे खरे

आहे की, सदरहू जमीन संपुर्ण गावाकडून खरेदी घ्यायला हवी होती याची कंपनीला कल्पना होती. आता मला निशाणी क्र.१३८ दाखविण्यात आले. त्यात एकुण १८ जण मालक म्हणुन लिहीलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखतामध्ये दावा मिळकत संपुर्ण मोह गावच्या मालकीची आहे असे कुठेही नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखतात दावा मिळकत केवळ १८ जणांच्या मालकीची असल्याचा उल्लेख केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखतात केवळ १८ लोक मालक व आमची कंपनी यांच्यात मोबदल्याची रक्कम ठरल्याबाबतचा उल्लेख आहे. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखतात दावा मिळकतीच्या मोबदल्याची रक्कम केवळ १८ लोकांना दिल्याबाबतचा मजकुर नमुद केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखताची रक्कम केवळ १७ जणांना दिलेली आहे, त्यात गावाचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ १८ जणांना दावा मिळकत विक्री करण्याचा अधिकार नसुन ती संपुर्ण गावाकडून घ्यायला हवी होती. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीचे ताबापत्र केवळ १८ जणांकडून लिहुन घेतलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, संपुर्ण गावाकडून दावा मिळकतीचा ताबा घेतला याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा आमच्याकडे नाही. आता मला निशाणी क्र.१७६ ते १८१ दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, सदर संमतीपत्र व हमीपत्रामध्ये संपुर्ण गावाने आम्हाला दावा मिळकतीचा ताबा दिल्याबाबत नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र.१७६ ते १८१ या संमतीपत्र व हमीपत्रांवर तारीख व ठिकाण नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर संमतीपत्र व हमीपत्रांवर किती जणांनी ते लिहुन दिले याबाबत सुरूवातीला नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर संमतीपत्र व हमीपत्र व्हॅल्युएबल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांना लिहुन दिलेले

आहे. खरेदीखताचा दस्त व्हॅल्युएबल प्रॉपर्टीज प्रा. लि. यांच्या लाभात झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रामध्ये व्हॅल्युएबल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. व व्हॅल्युएबल प्रॉपर्टीज प्रा. लि. या एकच कंपनी आहेत असा उल्लेख कुठेही केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, संमतीपत्र लिहुन देणार म्हणुन कुणाचीही सही नाही. हे म्हणणे खरे आहे की, व्हॅल्युएबल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. या कंपनीला दावा मिळकत देण्याचे ठरल्याबाबत संमतीपत्रामध्ये नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, खरेदी घेताना कायद्याप्रमाणे नोंदणीकृत दस्त करावा लागतो. हे म्हणणे खरे आहे की, संमतीपत्र व हमीपत्र हे नोंदणीकृत दस्त नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, संमतीपत्र व हमीपत्र नोंदणीकृत नसल्याने आम्हाला हक्क प्राप्त होत नाहीत. गावकीकडून पंच असल्याने व त्यांची मालकी असल्याने संमतीपत्रावर त्यांच्या सहया घेण्यात आल्या. हे म्हणणे खरे आहे की, सदर संमतीपत्र व हमीपत्रामध्ये दावा मिळकत विकण्याचा ठराव झाल्याबाबत कुठेही उल्लेख नाही. आता मला निशाणी क्र.१७७ दाखविण्यात आले. जयराम अनंत म्हात्रे, ज्यांच्या नावाने स्टॅम्प आहे त्यांची सदरहू दस्तावर सही नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र.१७८ या दस्तावर गणा धर्मा म्हात्रे, ज्यांच्या नावाने दुसरा स्टॅम्प घेतला, त्यांची देखील सदरहू दस्तावर सही नाही. आता मला निशाणी क्र.१७९ ते १८१ दाखविण्यात आले. सदरहू दस्तांवर ज्यांच्या नावाने स्टॅम्प घेतले, त्यांच्या सहया नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, या दाव्याचा निकाल महसुल मंत्री यांच्या आदेशावर बंधनकारक राहणार आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या कंपनीचे नाव सातबारा उताऱ्यावर यावे या अनुषंगाने प्रोसिडींग झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, संपुर्ण गावाला दावा मिळकतीचा मोबदला म्हणुन पैसे दिले असा उल्लेख

माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रामध्ये नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन २००७ मध्ये दावा मिळकत खरेदी घेतली, तेव्हा गावाची लोकसंख्या काय होती याबाबतचा उल्लेख माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रामध्ये, खरेदीखतामध्ये अथवा संमतीपत्र हमीपत्रामध्ये कुठेही केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, एजंटने सांगितल्याप्रमाणे गावाच्या लोकांना आम्ही चेक दिले. हे म्हणणे खरे आहे की, मोबदला दिल्याबाबतचा तपशील माझ्या कैफियततीत अथवा पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रामध्ये उल्लेख केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखत विनामोबदला झालेले असल्याने ते चुकीचे व बेकायदेशीर आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत संपुर्ण गावाची असल्याने आम्हाला केवळ १८ लोकांकडून खरेदी करण्याचा अधिकार नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही प्रामाणिक खरेदीदार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी शपथेवर खोटी साक्ष देत आहे.

**प्रतिवादी क्र.२० व त्यांचे वि. अधिवक्ता यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. प्रतिवादी क्र.२० तर्फे उलटतपास नाही.**

**प्रतिवादी क्र.४१ ते ४८ यांचे वि. अधिवक्ता यांनी प्रतिवादी क्र.२१ ते ४० तर्फे घेतलेला उलटतपास स्वीकृत केला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

**(ए.एस. बडगुजर)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
पनवेल

पनवेल
दिनांक : २३/०३/२०२६.